**CNR- MHDH05-001024-2017**

<u>निशाणी क्र. ५३ वर आदेश</u>

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी आजचे कामकाज तहकूब होऊन योग्य ती मुदत मिळणेसाठी केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, सदरचा दावा आज रोजी चौकशीसाठी ठेवला आहे, परंतु आज रोजी दाव्याची तयारी न झाल्याने सदरचा दावा चालवता येत नाही. तरी आजचे चौकशीचे कामकाज तहकूब होऊन मिळावे, अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जावार वादी यांच्यातर्फे पुरजोर विरोध करण्यात आला. प्रस्तुतच्या अर्जास सबळ कारण नाही, आर्जातील नमुद कारण कायदेशीर नाही. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा वाटणी, जाहीर घोषित होऊन मिळणेकरीता आणि निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ३,४ आणि ५ यांच्या विरुध्द प्रकरण हे एकर्तफा चालविण्यात येत आहे, याबाबत आदेश दिनांक १६.०३.२०२० रोजी करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ व २ यांची लेखी जबाब अभिलेखवर आहे. त्यानंतर माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक १८.०३.२०२१ रोजी प्रकरणात मुद्दे निश्चित केले.

५. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू

केली होती.  त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला.  मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले.  मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

**६.** प्रतिवादी यांना माहीत होतेच की, प्रकरण हे त्यांचे उलट तपासणीसाठी होते. अभिलेखावरुन असे दिसून येते की, दिनांक ०१.०४.२०२२ रोजी प्रतिवादी यांचे विधिज्ञ, यांच्या तोंडी विनंतीवरुन प्रकरण उलट तपासणीसाठी तहकूब करण्यात अलेले होते. त्यानंतर प्रकरण हे पुन्हा तहकूब करण्यात आले. प्रतिवादी यांना यापूर्वी देखील न्यायालयाने पुरेशी संधी दिलेली आहे. अर्जातील नमूद कारण हे सबळ व संयुक्तीक नाही. फक्त संधी मिळावी या दृष्टीने व न्यायशास्त्राचे तत्व Principle of natural Justice, या अन्वये अर्ज मंजुर करावासा वाटतो. प्रतिवादी यांना प्रकरणाची स्थिती बद्दल माहिती आहे. त्यामुळे काही शास्ती लादावी असे मला वाटते. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

- प्रतिवादी यांचा अर्ज रक्कम रुपये २००/–(रुपये दोनशे मात्र) कॉस्ट (शास्तीवर) मंजुर करण्यात येतो. सदरची शास्ती ही वादीस अदा करावी.
- प्रतिवादी यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेस प्रकरणामध्ये योग्य ती कार्यवाही करावी.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.06.14 17:53:54 +0530

( रा.भा.डोळे )

दिनांक : १४.०६.२०२२

सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

: **<u>प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १४.०६.२०२२.

स्वाक्षरीत/–
लघुलेखक श्रेणी –३